॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/८८ दिनांक : १४/०८/२०२५

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: एकात्म मानवदर्शन हया हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक स्तरावर आयोजन करणे बाबत.**

संदर्भ: १) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.उशिसं/मवि–१/एकात्म मा.दर्शन हि.महो/२०२५/ई. २०३९५२९ दि.०६/०८/२०२५

२) मा. राज्यपाल महोदयांचे, अवर सचिव, राजभवन पत्र क्र.RB/Edn.I/Gen-2025/CR-119/493, Dated 05th June 2025

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. २ च्या अनुषंगाने डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. १ अन्वये युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते. जगभरात सर्वात जास्त युवा वर्ग असणा–या भारत देशातील युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे व त्यांना राष्ट्रनिर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्वज्ञानावर आधारित "एकात्म मानवदर्शन" हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला. पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी "एकात्म मानवदर्शन" हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. त्यास सन २०२५ यावर्षी ६० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्त या हिरक महोत्सवी वर्षामध्ये विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर आयोजित करावयाच्या कार्यक्रमासाठी पुढिल सुचना देण्यात आलेल्या आहेत.

- एकात्मिक मानवतावाद – निबंध, भाषण, वादविवाद, पथनाटये या विषयावर स्पर्धा आयोजित करणे. तसेच शॉर्ट फिल्म्स, रिल्स आणि काव्यलेखन इ.
- विविध कार्यक्रमांचे आयोजन व समन्वय साधण्यासाठी विद्यापीठ स्तरावर तसेच महाविद्यालय स्तरावर एक प्रभारी प्रध्यापकाची नियुक्ती करावी.
- किमान ३५% विद्यार्थी सहभागी होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत आणि सहभागी विद्यार्थ्यांच्या तपशीलवार नोंदी ठेवण्यात याव्यात.
- सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र, विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत.
- विद्यापीठ स्तरावर एकात्मिक मानवतावादावर एक अध्यासन स्थापन करण्यात यावे.
- पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती (२६/१२/१९१६) आणि त्यांचा स्मृतीदिनी (११/०२/१९६८) देखील विविध व्याख्याने, कार्यक्रम यांचे आयोजन करावे.
- विद्यापीठ/महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावरील संबंधित साहित्याचा स्वतंत्र विभाग करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करावे
- सदरचे उपक्रम दि. २२ एप्रिल २०२६ पर्यंत सुरू राहतील, या दिशेने नियोजन करावे.
- उपरोक्त कार्यक्रमांचा खर्च संबधित संस्था/महाविद्यालये यांनी करावा.

पेज नं.– २

तरी त्यानुषंगाने रा.से.यो संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात मा. राज्यपाल महोदयांच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रात निर्देशित केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करून महाविद्यालयामध्ये एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक प्रमाणात आयोजन करण्यात यावे, ही विनंती.

प्रा. डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

<u>प्रत माहितीस्तव:</u>

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:</u>

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.